,भा.पा.हिवाळे शिक्षण संस्थेचे

ग्रामीण विकास अध्ययन केंद्र-समाजकार्य व संशोधन संस्था, अहमदनगर

# शोध निबंध सादरीकरण

## विषयः-

## “आरोग्य- कोरोना प्रतिबंध आणि जनजागृती”


सादरकर्ती

कु. गायत्री सं. ओगले

MSW-II

मार्गदर्शिका

प्रा. आसावरी झपके

CSRD-ISWR,

अहमदनगर

# कार्याची पार्श्वभूमी

- महाराष्ट्रातातील अहमदनगर जिल्ह्यातील एमआयडीसी भागांत मॉडेल स्कुल प्रोजेक्ट चे कामकाज चालते.
- यात एमआयडीसी भागांमधील १० शाळांमध्ये हा प्रकल्प राबविला जातो.
- ‘शिक्षण अधिकार’ यावर याचे मुख्य कार्य चालते. अप्रगत मुलांचे वर्ग घेणे, शाळेला भौतिक सुविधा पुरवणे व समुदाय संघटन या माध्यमातून काम केले जाते.
- प्रकल्पांतग्रत खंडांबे, वडगाव गुप्ता, शेंडी, जेऊर, नागापूर, नवनागापुर, निंबळक, देहरे व बुऱ्हानगर या गावांचा समावेश होतो.

# समाजकार्य हस्तक्षेप

- कोरोना काळात सामाजिक, आर्थिक, मानसिक आणि भावनिक आरोग्य या समस्या उद्भवलेल्या आहेत. यासाठी समाजात जनजागृती करणे अधिक महत्वपूर्ण ठरते.
- समुदायात कोविड-१९ व  लसीकरण जनजागृती कार्यक्रम राबवून याच प्रयत्नातून सामाजिक परिवर्तनाचा प्रक्रियेला गती प्राप्त करून देणे.
- समुदायात आरोग्य जागरूकता कार्यक्रम घेऊन विद्यार्थी व कामगार वर्ग यांच्या समस्येचे निराकरण करणे.

# समाजकार्य पद्धती

- गटकार्य- मुलांचे उपक्रम घेणे व लसीकरण कॅम्प
- समुदाय संघटन- कोविड-१९ जनजागृती कार्यक्रम व लसीकरण जनजागृती, शासकीय उपक्रमांचा लाभ मिळवून देणे

# निरीक्षण व शिकण्यास मिळालेल्या बाबी

- समुदायाचे जीवनमान हे आधीपेक्षा खूप बदलले आहे. मास्क व सॅनिटायझर हे लोकांच्या जीवनावश्यक वस्तूंपैकी एक झाले आहे.
- लोकांमधील अशिक्षितपणा व असमंजसपणा यामुळे लोक त्याच्या हितासाठी असणाऱ्या योजनांचा फायदा घेऊ शकत नाही.
- प्रतिबंधात्मक उपाय व लसीकरण याची समुदायांमध्ये जनजागृती केली असता लोकांमध्ये सकारात्मक बदल दिसून आले.
- अभ्यासक्रमात शिकवलेले ज्ञान, कौशल्य, पद्धती, मूल्ये व सिद्धांत यांचा क्षेत्रकार्यामध्ये प्रत्यक्षात वापर करण्यात आला.
- नियोजन कौशल्य, माहिती व तंत्रज्ञान कौशल्य, नेतृत्व कौशल्य, प्रशासकीय पद्धती, इ कौशल्य शिकण्यास मिळाली.
- व्यावसायिक कार्याशी संबंधित नैतिक पद्धती व सामाजिक मूल्ये विकसित करणे व प्रत्येक व्यक्तीच्या आदर करणे व तिची प्रतिष्ठा जपणे हे शिकण्यास मिळाले.

# आव्हाने व अडचणी

- सगळीकडे कोरोनाचा प्रादुर्भाव असल्यामुळे लोकांना भेटणे हवे तितके शक्य नव्हते.
- समुदायांमध्ये कोरोना रुग्ण सक्रिय असल्यामुळे मोठे एकत्रीत कार्यक्रम समुदायमध्ये घेता नाही आला.
- कोरोना नियमांचे अनेक लोक पालन करत नव्हती व त्याविषयी जागरूक नव्हती.
- लसीकरणाविषयी लोकांमधील गैरसमजुती कमी करताना अनेक समस्या आल्या
- लोक लसीकरण करण्यासाठी टाळाटाळ करत होती.

# लोकांमध्ये झालेला बदल

- अनेक लोकांच्या मनातील लसीकरणाविषयीची भीती कमी झाली. त्यांनी लसीकरणाचा लाभ घेतला.
- कोरोना आजाराविषयी लोक अधिक सतर्क झाले.
- मुलांना येणाऱ्या काळामध्ये स्वतःची काळजी कशी घ्यायला हवी याचे ज्ञान मिळाले.
- ज्या मुलांनी कोविड-१९ मध्ये त्यांचे पालक गमावले आहेत अशा मुलांचो शाळा व ग्रामपंचायत मार्फत शासकीय मदतीसाठी नोंदणी करण्यात आली.

# मूल्यांकन व समारोप

- प्रशिक्षणार्थी समाजकार्यकर्त्याने समुदायांमध्ये केलेल्या कोविड लसीकरणाच्या जनजागृती उपक्रमाचा लोकांमध्ये सकारात्मक बदल झालेला दिसून आला. त्यात ६० पेक्षा अधिक वयोगट असणाऱ्या एकूण ६५% ,लोकांनी, ४५, ते ५९ वयोगटातील ४०% व १८ ते ४४ वयोगटातील ३०% लोकांनी लसीकरणाचा आतापर्यंत लाभ घेतला आहे. तसेच जी लोक आधी लस घेण्यास भीत होते त्यांनी स्वतः लस घेऊन इतरांनाही लस घेण्यासाठी सल्ला देत आहेत.
- कोरोना काळात सामाजिक, आर्थिक व आरोग्य समस्या लक्षात घेऊन या समस्यांचे निवारण करताना लोकांच्या अडचणींवर योग्य उपाय सुचविण्यात आले.

# धन्यवाद